आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२६ मार्च २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीच्या प्रक्रीयेला देशभरात वेग
- नागपूरमधे काँग्रेसचे विकास ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल,/ भाजपा उमेदवार नितीन गडकरी उद्या अर्ज भरणार
- गाझामध्ये तात्काळ युद्धबंदी आणि ओलीसांची तात्काळ बिनशर्त सुटका करण्याचं आवाहन करणारा ठराव संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षापरिषदेत मंजूर
- मियामी मास्टर्स एटीपी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यु एबडेन या जोडीचा पुरूष दुहेरीच्या उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश

**आणि**

- येत्या पावसाळ्यात जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यात  भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा आशिया-प्रशांत आर्थिक सहकार्य हवामान केंद्राचा अंदाज

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशभरात आता राजकीय घडामोडीनी वेग घेतला आहे. देशात सात टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज प्रक्रिया सुरू असून उद्या अर्ज  भरण्याचा अंतिम दिवस आहे तर २८ तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. या टप्प्यात येत्या १९ एप्रिलला मतदान होणार आहे.

महाराष्ट्रात नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघात पहिल्या टप्प्यामध्ये मतदान होणार असून, इथल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेसनं केली आहे. उमेदवारांची नामनिर्देशन पत्र भरण्याच्या प्रक्रीयेला वेग आला असून उमेदवारांनी आपापल्या मतदारसंघात दौरे सुरु केले आहेत.

नागपूर लोकसभा मतदारसंघातले काँग्रेसचे उमेदवार आमदार विकास ठाकरे यांनी आपला उमेदवारी अर्ज आज जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केला. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी खासदार विलास मुत्तेमवार, सतीश चतुर्वेदी, माजी मंत्री अनिल देशमुख, नितिन राऊत आणि सुनील केदार हे महाविकास आघाडीचे नेते त्यांच्यासोबत होते. भाजपाकडून ज्येष्ठ नेते नितीन गडकरी आपला उमेदवारी अर्ज उद्या दाखल करणार आहेत.

काँग्रेसनं चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी दिली आहे. या मतदार संघात भाजपनं सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भंडारा गोंदियामधे भाजपाने सुनील मेंढे यांना उमेदवारी दिली असून काँग्रेसतर्फे प्रशांत पडोळे निवडणूक लढवणार आहेत.

गडचिरोली-चिमूर मतदारसंघात भाजपाचे अशोक नेते यांच्या विरोधात काँग्रेसचे नामदेव किरसान निवडणूक लढवणार आहेत. रामटेक मधे काँग्रेसच्या उमेदवार रश्मी बर्वे आहेत.

उत्तर प्रदेशात या निवडणुकीत आरएलडी भाजपसोबत आहे, तर सपा आणि काँग्रेस एकत्र निवडणूक लढवत आहेत. बसपानं स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे.

कर्नाटकमध्ये, KRPP चे नेते जी जनार्दन रेड्डी यांनी काल आपला पक्ष भारतीय जनता पार्टीमध्ये विलीन केला आणि लोकसभा निवडणुकीपूर्वी पत्नी अरुणा लक्ष्मीसह भाजपामध्ये प्रवेश केला.

तेलंगणमध्ये, भारत राष्ट्र समिती (BRS) पक्षानं, सर्व १७ लोकसभा मतदारसंघांसाठी काल आपले उमेदवार जाहीर केले. बिहारमध्ये, गया, नवादा, औरंगाबाद आणि जमुई लोकसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारांच्या उमेदवारी अर्ज प्रक्रियेला वेग आला आहे.

**<><><><><>**

आसाममध्ये आज पहिल्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी अनेक ज्येष्ठ नेते उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी दिब्रूगडमधून अर्ज भरला असून आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यावेळी उपस्थित होते. काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई जोरहाट मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरतील. या टप्प्यात आसाममधे पाच जागांसाठी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

अभिनेत्री कंगना रणौत विरोधात कथित अवमानकारक वक्तव्य केल्या प्रकरणी काँग्रेसच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत आणि पक्षनेता एच एस अहिर यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रीय महिला आयोगानं  निवडणूक आयोगाकडे केली आहे. महिला आयोगाच्या अध्यक्ष रेखा शर्मा यांनी निवडणूक आयुक्तांना यासंदर्भात पत्र लिहिल्याचं महिला आयोगानं समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. दोघांची वागणूक महिलांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारी असून ती खपवून घेतली

जाणार नाही, असं शर्मा यांनी पत्रात सांगितलं आहे.  कंगना रणौत या हिमाचल प्रदेशातल्या मंडी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

दरम्यान आपली फेसबुक आणि इन्स्टाग्रॅम अकाउन्टस अनेक जण वापरत असल्यामुळे ती हॅक झाली आहेत आणि त्यामुळे आपण समाजमाध्यमावरून ती पोस्ट काढून टाकल्याचं सुप्रिया श्रीनेत यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय तटरक्षक दलाच्या वतीनं समुद्र पहारेदार हे विशेष प्रदूषण नियंत्रण जहाज आशियाई सैन्यबलात तैनात करण्यासाठी मनिला बे फिलिपिन्स इथं पोहचलं आहे. हे जहाज भारतीय तटरक्षक दलाच्या सागरी प्रदूषण प्रतिसाद क्षमतांचे प्रदर्शन आणि आशियाई देशांच्या सागरी परिसरातील प्रदूषणाविषयीची चिंता आणि निराकरणाच्या दृष्टीनं उचलेलं महत्वाचं पाऊल आहे. या जहाजामध्ये विशेष सागरी प्रदूषण नियंत्रण उपकरणं आणि प्रदूषण प्रतिसाद कॉन्फिगरेशनमधल्या चेतक हेलिकॉप्टरनं सुसज्ज असून जे सांडलेले तेल समाविष्ट करण्यासाठी आणि पुन्हा प्राप्त करून त्याचा वापर वाढवण्यासाठी तयार करण्यात आल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे. आशियाई देश फिलिपिन्स, व्हिएतनाम आणि ब्रुनेई इथं हे जहाज पुढील महिन्याच्या १२ तारखेपर्यंत तैनात राहणार आहे.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं गाझामध्ये तात्काळ युद्धबंदीचं आवाहन केलं आहे. ऑक्टोबरमध्ये युद्ध सुरू झाल्यापासूनच्या अनेक अयशस्वी प्रयत्नांनंतर परिषदेनं पहिल्यांदा युद्धबंदी बरोबरच सर्व ओलीसांची तात्काळ आणि बिनशर्त सुटका करण्याचं आवाहन केलं आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये यासंदर्भात

झालेल्या प्रस्तावावर मतदानाच्या वेळी अमेरिका अनुपस्थित राहील्यामुळे गाझातल्या युद्धासंदर्भात अमेरिकेचे इस्रायलशी मतभेद वाढत असल्याचं मानलं जात आहे. अमेरिकेनं आपली भूमिका बदलल्याचं इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांच्या कार्यालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. नवीन ठरावावर अमेरिकेनं नकाराधिकार न वापरल्यामुळे ओलिसांच्या सुटकेचे प्रयत्न तोकडे पडले असून, हे अत्यंत खेदजनक असल्याचं या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. इस्रायली शिष्टमंडळ आणि वॉशिंग्टनमधले अमेरिकन अधिकारी यांच्यात या आठवड्यात होणाऱ्या बैठका रद्द करण्याचा निर्णय नेतन्याहू यांनी घेतला आहे. गाझामधल्या ओलिसांची सुटका जोपर्यंत होत नाही तोपर्यंत युद्ध थांबवणार नाही असं इस्राईलच्या संरक्षण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

येत्या काही वर्षात भारत हा विकासाच्या केंद्रस्थानी असेल आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेच्या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी भारतानं जे केलं आहे ते श्रीलंका करेल, असं आज श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांनी सांगितलं. ते कोलंबो इथं भारतीय उच्चायुक्तालयानं आयोजित केलेल्या परिषदेत बोलत होते. डिजिटल इंडियाच्या यशस्वी वाटचालीविषयीची माहिती भारताचे श्रीलंकेतले उच्चायुक्त संतोष झा यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये, वार्षिक अमरनाथ यात्रेच्या तयारीला सुरूवात झाली आहे. त्यासाठी यात्रेकरूंना आवश्यक परवानगी देणाऱ्या आरोग्य प्रमाणपत्रांची व्यवस्था जम्मू विभागातल्या दहा जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे.

<><><><>

अमेरिकेत फ्लोरिडा इथं सुरू असलेल्या मियामी मास्टर्स एटीपी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यु एबडेन ही जोडी पुरूष दुहेरीच्या उपांत्य पूर्व फेरीत पोहोचली आहे. त्यांनी काल रात्री झालेल्या सामन्यात प्रतिस्पर्धी जोडीचा ७-५, ७-६ असा सरळ सेटमधे पराभव केला. बोपण्णा- एबडेन या जोडीचा उपांत्य पूर्व सामना उद्या होईल.

<><><><>

आयपीएल टी-ट्वेन्टी क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नईच्या के एम ए चिदम्बरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरु होईल.

बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर काल झालेल्या सामन्यात रॉयल चैलेंजर्स बंगळुरूनं पंजाब किंग्जचा चार गडी राखून पराभव केला.

<><><><>

कन्याकुमारी इथं झालेल्या राष्ट्रीय स्तरावरच्या आंतरशालेय सिलंबम स्पर्धेत महाराष्ट्राने दुसरा क्रमांक पटकावला. सिलंबम ही तमिळनाडूतली प्राचीन युद्धकला असून त्यात लाठ्याकाठ्यांचा वापर होतो. २२ ते २५ मार्च दरम्यान झालेल्या या स्पर्धेत मुंबईच्या विद्यानिधी विद्यालयाच्या चमूने एक सुवर्ण, दोन रौप्य आणि पाच कांस्य पदकांची कमाई केली.

<><><><>

मुंबईत घाटकोपर उपनगरात आज पहाटे झालेल्या रस्ते अपघातात दोन बाईकस्वार आणि एक पादचारी असे तीनजण ठार झाले.

**<><><><><>**

येत्या पावसाळ्यात जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यात भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज आशिया- प्रशांत आर्थिक सहकार्य हवामान केंद्रानं वर्तवला आहे. या केंद्रानं भारताविषयीचा यंदाचा पहिला हवामान अंदाज जाहीर केला आहे. एप्रिल ते जूनसाठीचा हवामान अंदाजही या केंद्रानं तयार केला आहे.

अल निनोच्या सातत्यपूर्ण प्रभावामुळे यंदाचा उन्हाळा तीव्र असण्याची शक्यता असल्याचं भारतीय हवामानशास्त्रविभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा यांनी सांगितलं आहे. मात्र उन्हाळ्यानंतर अल निनोचा परिणाम कमी होईल, अशी माहिती त्यांनी दिली. मान्सून हंगामाच्या उत्तरार्धात चांगला पाऊस पडेल असा अंदाज आहे.

**//<><><><><>//**